Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

दैनिक

अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | गुरूवार, 19 नोव्हेंबर 2026 | अंक क्र. 179 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

परिवर्तन पॅनलच्या सर्व विजयी शिलेदारांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अभिनंदन

■ लातूर प्रतिनिधी

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक पदाच्या निवडणुकीत रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनलच्या विजयी उमेदवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची आज बुधवारी मुंबईत भेट घेऊन आशीर्वाद घेतले असता मुख्यमंत्री महोदयांनी परिवर्तन पॅनलच्या विजयी सर्व शिलेदारांचे अभिनंदन करून सहकार क्षेत्रातील लोकाभिमुख कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळासाठी नुकतीच निवडणूक झाली. वर्षानुवर्ष ठराविक मतदार नियुक्त करून काँग्रेसने जिल्हा बँकेवर सत्ता मिळविली या एकाधिकार आणि घराणेशाही विरुद्ध महायुती नेत्यांच्या नेतृत्वात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनलच्या माध्यमातून लढत दिली. या अटीतटीच्या लढतीत अरविंद पाटील निलंगेकर, ऋषिकेश रमेशआप्पा कराड, भगवानराव पाटील तळेगावकर आणि अतुल गंभीरे यांनी मोठा विजय संपादन केला तर सौ. शोभाताई अभिमन्यू पवार या बिनविरोध निवडून आल्या आहेत. परिवर्तन पॅनलच्या माध्यमातून पाच जणांनी जिल्हा बँकेत दिमाखाने प्रवेश केला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मिळालेल्या विजयाच्या पार्श्वभूमीवर आज बुधवारी मुंबई येथे परिवर्तन पॅनलच्या विजयी उमेदवारांनी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लातूर जिल्हा बँकेत आजपर्यंत सुरू असलेला सर्व गैरकारभार थांबवून लोकाभिमुख कारभार सुरू करून जिल्ह्यात सहकार क्षेत्र समृद्ध करू अशी ग्वाही दिली.

परिवर्तन पॅनलच्या सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून जिल्हा बँक लोकाभिमुख करावी विकासात्मक कामांना गती द्यावी शासन आपल्या पाठीशी आहे असे मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी बोलून दाखविले. याप्रसंगी माजी मंत्री आ. संजय बनसोडे, आ. अभिमन्यू पवार यांच्यासह परिवर्तन पॅनलचे विजयी शिलेदार अरविंद पाटील निलंगेकर, ऋषिकेश रमेशआप्पा कराड, भगवानराव पाटील तळेगावकर, अतुल गंभीरे त्याचबरोबर दगडू साळुंखे, गिरीश पाटील, कपिल माकणे, भरत चामले , ॲड. ईरपतगिरे आदी होते.



मुख्यमंत्र्यांच्या सूचना अन् महापालिका सभागृह भरले घड्याळाच्या काट्यावर

■ मुंबई (वृत्तसंस्था):

मुंबई महापालिकेचे सभागृह हे मागील काही महिन्यांपासून नियोजित वेळेत सुरु न करता एक ते दीड तास उशिराने सुरु केले जात होते. याची दखल खुद्द राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. आणि त्यांनी महापौरांसह सभागृहनेत्यांना निर्देश दिल्यानंतर बुधवारी झालेल्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या सभेचे कामकाज अगदी दुपारी 2 वाजता घड्याळाच्या काट्यावर सुरु झाले. महापौर चक्क दोन वाजताच सभागृहात दाखल झाल्या आणि त्यांनी कामकाजाला सुरुवात केले. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचा डोस महापालिकेत लागू झाल्याचे दिसून येत आहे.

मुंबई महापालिकेत फेब्रुवारी महिन्यात नवीन महापालिका अस्तित्वात आल्यानंतर सुरुवातीला वेळेत सुरु होणारे सभागृहाचे कामकाज पुढे एक ते दीड तास किंवा त्याहून अधिक उशिराने सुरु केले जात होते. तसेच उशिराने कामकाज सुरु करतानाच रात्री उशिरापर्यंत ते चालवले जात होते. त्यामुळे यापूर्वीच पक्षाकडे नाराजी पोहोचली होती. त्यातच मागील वेळेस पार्टीसिपेट मुंबईच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महापालिका मुख्यालयात आले असता महापौर आणि



सभागृहनेत्यांनी त्यांना दालनात येण्याची विनंती केली. परंतु मला वेळेतच कॅबिनेट सुरु करायची असते, तुमच्यासारखे उशिराने नाही असा मिश्किल टोला मारला होता. त्यानंतर काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी महापौर आणि सभागृहनेत्यांना वेळेतच सभागृह सुरु करा अशी सूचना केली होती. त्यानुसार बुधवारी 18 नोव्हेंबर रोजी झालेल्या महापालिकेचे सभागृहातील कामकाजाला 2 वाजता सुरु होईल असा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार महापौर रितू तावडे यांनी चक्क 2 वाजताच सभागृहात प्रवेश केला आणि कामकाजाला सुरुवात केली. तसेच भाजप नगरसेवकांना यापूर्वीच सभागृहात जावून बसण्याच्याही सूचना केल्या होत्या. त्यामुळे महापालिकेच्या इतिहासात प्रथम वेळेत घड्याळाच्या काट्यावरच सभागृह सुरु झाल्याचे दिसून येत आले आहे.

विरोधकांचा गोंधळाने सुरुवात

महापालिका सभागृह वेळेत सुरु झाल्याने शिवसेनेने मात्र शायना एन.सी यांच्या विरोधात घोषणा देत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. यावेळी विरोधी पक्षनेत्यांनी यावर निवेदन करण्याचा प्रयत्न केला. परंतु महापौरांनी सभागृहाच्यावतीने बाळासाहेबांचा अवमान कुणीही सहन करणार नाही असे सांगत विरोधकांना शांत करण्याचे काम केले. परंतु त्यानंतरही विरोधकांचा गोंधळ सुरु असल्याने महापौरांनी नियमित कामकाजाला सुरुवात केली. त्यामुळे याचा निषेध व्यक्त करत उबाठासह काँग्रेस आणि मनसेच्या नगरसेवकांनी सभात्याग करत सभागृहाबाहेर घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली.

मुंबई ते सहरसादरम्यान 2 अतिरिक्त विशेष रेल्वे ; 19 नोव्हेंबरला लोकमान्य टिळक टर्मिनसवरून सुटणार

■ मुंबई वृत्तसंस्था

सण-उत्सवांच्या काळात रेल्वे प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने मुंबईतील लोकमान्य टिळक टर्मिनस आणि बिहारमधील सहरसा दरम्यान 2 अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्यांमुळे मुंबई आणि बिहारदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस-सहरसा विशेष गाडीचे वेळापत्रक

विशेष गाडी क्रमांक 01019 ही 19 नोव्हेंबर 2026 रोजी रात्री 10.55 वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटेल. ही गाडी 21 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 5.20 वाजता सहरसा येथे पोहोचेल.

परतीची विशेष गाडी क्रमांक 01020 ही 22 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 4 वाजता सहरसा येथून सुटेल. ही गाडी 24 नोव्हेंबर रोजी दुपारी 12.10 वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल.



गाडीतील डब्यांची रचना

■ या विशेष रेल्वेमध्ये 12 शयनयान डबे, 6 सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे आणि गार्ड्स ब्रेक व्हॅनसह 2 सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असतील.

■ गाडी क्रमांक 01019 साठी आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच IRCTC च्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे. अनारक्षित डब्यांसाठी UTS प्रणालीद्वारे सामान्य दरात तिकीट काढता येईल. प्रवाशांना RailOne ॲपचाही वापर करता येईल. या गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रक जाणून घेण्यासाठी भारतीय रेल्वेच्या चौकशी संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा NTES ॲपचा वापर करावा, असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

कोणत्या स्थानकांवर थांबणार?

या विशेष गाड्यांना ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, भुसावळ, खंडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, मानिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापूर, पाटलीपुत्र, हाजीपूर जंक्शन, बरौनी, बेगूसराय आणि खगडिया जंक्शन येथे थांबे असतील.

खाजगी फायनान्स कंपनीने घराला केलेले सिल आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून उघडले

लातूर तालुक्यातील मौजे ममदापूर येथील अल्पभूधारक शेतकऱ्याला दिलासा

■ लातूर प्रतिनिधी

खाजगी फायनान्स कंपनीकडून घेतलेल्या कर्जाचे वेळेवर हप्ते भरले नाहीत म्हणून लातूर तालुक्यातील मौजे ममदापूर येथील अल्पभूधारक शेतकरी नवनाथ बोयणे यांच्या घराला लावलेले सील लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी संबंधितांशी चर्चा करून आज मंगळवारी सकाळी लावलेले सील काढून बोयणे यांना त्यांचे हक्काचे घर ताब्यात देण्यात आले. दुष्काळाच्या काळात कोणत्याही वित्तीय संस्थांनी वसुलीसाठी तगादा करू नये दबाव टाकू नये अन्यथा कायदेशीर कारवाई करण्याचे शासनाचे आदेश असल्याचे आ. कराड यांनी यावेळी बोलून दाखविले.

लातूर तालुक्यातील मौजे ममदापूर येथील अल्पभूधारक शेतकरी नवनाथ नरसिग बोयणे यांनी चार वर्षांपूर्वी अडीच लक्ष रुपये एक्विटास या खाजगी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले होते. आठ दहा हप्त्याची परतफेड केली मात्र उर्वरित हप्ते नैसर्गिक संकटामुळे फेडता आले नाहीत. सदरील कंपनीने नोटीसा देऊन न्यायालयाच्या आदेशानुसार बोयणे यांच्या घरास सात आठ महिन्यापूर्वी सील ठोकले होते. सदरची माहिती मीडियाच्या माध्यमातून मिळताच आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधित मंत्री महोदयासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली असता प्रशासनाने तातडीने दखल घेतली. सदरील खाजगी फायनान्स कंपनीच्या संबंधीतांशी चर्चा केली.

मौजे ममदापूर येथे आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत १७ नोव्हेंबर मंगळवार आज रोजी सकाळी फायनान्स कंपनीच्या संबंधितांनी घराचे सील उघडून नवनाथ बोयणे यांच्या कुटुंबीयांना घर खुले करून दिले. संकटाच्या काळात आ. कराड यांच्या प्रयत्नामुळे अल्पभूधारक शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी बोलताना आ. कराड म्हणाले की, कर्ज पुरवठा करणाऱ्या सर्व संस्थांना दुष्काळाच्या काळात वसुली करू नये अथवा तगादा लावू नये अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे शासनाचे सक्त आदेश आहेत. बोयणे यांचे प्रकरण सात आठ महिन्यापूर्वीचे आहे. दुष्काळाच्या या काळात कोणत्याही कर्जदाराला पतपुरवठा करणाऱ्या कोणत्याही संस्थेकडून त्रास झालेला नाही. जर वसुलीसाठी कोणी दबाव टाकला, तगादा लावला तर त्यांनी संबंधित प्रशासनाला कळवावे असे बोलून दाखविले. घराला सिल ठोकल्याने आम्ही रस्त्यावर आलो होतो, मात्र आमदार साहेबांमुळे आम्हाला आमचे हक्काचे घर ताब्यात मिळाले असल्याची भावना नवनाथ नरसिंग बोयणे यांनी व्यक्त केली तर दुष्काळाच्या काळात शासन आणि प्रशासन शेतकरी शेतमजूर जनतेसोबत आहे असे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी बोलून दाखविले.

याप्रसंगी नवनाथ बोयणे यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यासह किसान आघाडीचे विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंखे, प्रताप पाटील, पांडुरंग बालवाड, गोविंद नरहरे, विजयकुमार मलवाडे, संजय ठाकूर, हनुमंत गव्हाणे, सुरेश पाटील, चंद्रकांत पासमे, आदिनाथ मुळे, रुपेश थोरमोटे, सतीश बिराजदार, सूर्यकांत शेळके, संजय सावंत, पद्माकर शिंदे, ज्ञानोबा शेळके, मारुती शिंदे, पुंडलिक बेंबडे, दत्तू वंगवाड, बालाजी पासमे, लिंबराज बोळंगे, मंडल अधिकारी दिलीप देवकते तलाठी अनुराधा पन्हाळे यांच्यासह ग्रामस्थ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संपादकीय

'गजराजा'ची सामरिक मुसंडी

भारतीय हवाई दलात 'गजराज' या नावाने परिचित असलेल्या आयएल ७६ या विशाल युद्धसामग्रीवाहक विमानाने लडाखमधील न्योमा या १३ हजार ६२९ फूट उंचीवरील धावपट्टीवर यशस्वी लँडिंग केले. रणगाडे आणि तोफांपासून सैनिकांच्या तुकड्यांपर्यंत सुमारे ४० ते ४५ टन इतक्या वजनाची सामग्री नेणारे हे विमान इतक्या उंचीवर उतरण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. गजराजाच्या या सामरिक मुसंडीमागे अनेक महत्त्वाचे पैलू आहेत, त्यांचा वेध घ्यायला हवा.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ही धावपट्टी चीनलगतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून अवघ्या २५ किलोमीटरवर आहे. भारत-चीन यांच्यात सीमानिश्चिती नसल्याने वारंवार डोके वर काढणारे पेचप्रसंग पाहता रसदपुरवठा, फौजांची जमवाजमव व युद्धसामग्रीची ने-आण हे सर्व अत्यंत कमी वेळात करणे आवश्यक असते. गलवानमध्ये सन २०२०मध्ये झालेल्या संघर्षाच्या वेळी भारतीय हवाई दल ाच्या युद्धसामग्रीवाहक विमानांमधून ६८ हजार सैनिक, ९० रणगाडे आणि सव्वातीनशे चिलखती वाहने अतिउंचीवर नेण्यात आली होती. लेह, थॉइस, कारगिल या हवाई तळांबरोबरच दौलत बेग ओल्डी, फुकचे आणि न्योमा या अत्युच्च उंचीवरील हवाई धावपट्ट्या गेल्या काही वर्षांत सक्रिय करण्यात आल्या आहेत. दौलत बेग ओल्डी ही सर्वाधिक म्हणजे १६ हजार ६१४ फूट उंचीवरची धावपट्टी आहे, तर न्योमा हीसुद्धा तितकीच आव्हानात्मक १३ हजार ६२९ फूट उंचीवरची धावपट्टी आहे. इतक्या दुर्गम, डोंगराळ प्रदेशात आणि प्रतिकूल वातावरणात अशा धावपट्ट्या बांधल्या, त्याबद्दल प्रथम भारतीय हवाई दल व बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन (बीआरओ) यांचे कौतुक केले पाहिजे. सामरिकदृष्ट्या अत्यंत मोक्याच्या स्थळी असलेल्या या दोन्ही धावपट्ट्यांसभोवतीचे प्रदेश थोडेथोडे वेगळे असल्याने बांधकामाची आव्हाने वेगवेगळी होती. न्योमा येथे १९६२मध्ये प्रथम धावपट्टी अस्तित्वात आली; परंतु ती बराच काळ उपयोगात आली नव्हती व मोठी विमाने त्यावर उतरविणे शक्य नव्हते. २००९च्या सुमारास दौलत बेग ओल्डीच्या यशानंतर ही धावपट्टीही पुन्हा वापरात आणण्याचा निर्णय झाला. त्या दृष्टीने पायाभरणी सुरू झाली. सन २०२०च्या भारत-चीन पेचप्रसंगानंतर त्यास अधिक बळ मिळाले. न्योमा धावपट्टीच्या सक्षमीकरणासाठी २१८ कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प आखण्यात आला व २०२३ मध्ये काम सुरू झाले.

या सर्व काळात भारतीय हवाई दल व बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन यांनी 'प्रोजेक्ट हिमांक'अंतर्गत उणे ३० अंश तापमानात या २.७ किलोमीटर लांबीच्या धावपट्टीचे काम पूर्ण केले. धावपट्टीसाठी समतल भाग उपलब्ध असलेली न्योमा ही एकमेव जागा होती. सिंधू खोऱ्यातील नदीपात्राजवळ ही धावपट्टी असल्याने, सिमेंटसारख्या मिश्रणाचा वापर करताना तिथे पाण्याचीही कमतरता भासत असे. प्रत्यक्ष कामाकरिता सात महिन्यांचाच उपयुक्त कालावधी मिळाला. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये 'सी १३०' जे हे सामग्रीवाहक विमान न्योमा धावपट्टीवर उतरविण्यात आले.

इतक्या उंचीवर विमान उतरविण्यात वैमानिकाच्या कौशल्याची कसोटी असते. गतिमापकावर दिसणाऱ्या वेगापेक्षा विमानाचा प्रत्यक्ष वेग अधिक असू शकतो. दहा-बारा हजार फुटांवर गेल्यावर हवा विरळ असल्याने इंजिनासाठीही पुरेशा प्रमाणात प्राणवायू मिळत नाही. विमान हवेत भरारी घेण्यासाठी हवेचा लोट तयार करण्याकरिता इंजिनाला अधिक कष्ट उपसावे लागतात. याउलट विमान लँडिंग करते, त्या वेळी वेग अधिक असल्याने झटपट धावपट्टीचा वापर होतो, बर्फामुळे ब्रेकिंग कमी होते. साहजिकच धावपट्टीची लांबी अधिक लागते. विमान उतरवताना चूहबाजूंनी पर्वत वेढलेले असतात, कधी ढगांनी दाटी केलेली असते. अशा वेळी पटकन वळणे किंवा विमान थोडे कलते त्या गोष्टींना कमालीच्या मर्यादा असतात. या सर्व संकटांचा विचार करता एक 'एएन ३२' किंवा 'सी १३०' वापरल्यास चार उड्डाणफेऱ्या कराव्या लागतील, त्याऐवजी एका गजराजच्या फेरीत सर्व फौजा, रणगाडे, चिलखती वाहने सीमेजवळ तैनात करता येतील. या विमानांचा पल्लाही मोठा असल्याने अगदी दक्षिण भारताच्या टोकाला तिरुवनंतपूरममध्ये असलेल्या सैनिकांच्या तुकडीलाही थेट लेह-लडाख किंवा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेलगत तैनात करता येईल. भारताला दर वेळी दुहेरी आघाड्यांवरील युद्धासाठी सुसज्जता ठेवावी लागत आहे; शिवाय आपण कोणती सामग्री वापरतो, त्याबाबतही जागरूक राहावे लागणार आहे. 'सी १७' हे गजराजपेक्षा अधिक वहनक्षमतेचे (सुमारे ७७ टन), पल्ल्याचे विमान अमेरिकी बनावटीचे आहे, तर गजराज हे रशियन बनावटीचे. अनेक आघाड्या उघडाव्या लागल्यास प्रत्येक श्रेणीच्या विमानाची कुठे ना कुठे गरज भासू शकते. नव्या युद्धखेळीत क्षेपणास्त्र, ड्रोन यांमुळे व्यूहरचना आणि प्रतिसाद यांत बदल झाले आहेत. निसर्ग हाच सर्वोच्च निर्णयकर्ता असलेल्या या प्रदेशात पारंपरिक सुसज्जतेचे कडेही मजबूत ठेवावे लागत आहे.

मानवतेचे पूजक : नियाजोद्दीन गुरुजी

करून जावे असेही काही
दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या
निरोप शेवट देताना
स्वर कठोर त्या काळाचाही
क्षणभर व्हावा कातर कातर
नजर रोखुनी नजरेमध्ये
आयुष्याला द्यावे उत्तर....!





या काव्यपंक्तीप्रमाणे काही माणसं या जगातून निघून जातात पण ते निघून गेल्यावर आपल्या आजूबाजूच्या भोवतालावर कायमचा ठसा उमटवून जातात. त्यांचं आपल्यातून निघून जाणं ही आपल्या हृदयावर उमटलेली कायमची क्षती असते. कारण त्यांचं नाव हे इतरांच्या मनावर कायम कोरल्या गेलेलं असतं.ती माणसं आज जरी आपल्यात नसली तरी त्यांची आठवण कायम रुंजी घालत असते, असंच अविस्मरणीय व्यक्तिमत्व म्हणजे रेवलीचे नियाजुद्दीन गुरुजी. त्यांचे वडील शेख लाल गुरुजी हे स्वातंत्र्यपूर्व काळात सिरसाळा परिसरातील गाव खेड्यांच्या समूहात चालते बोलते विद्यापीठच होते;असे आमचे वडील (आप्पाराव मुंडे)सांगायचे अगदी त्याचप्रमाणे आपल्या वडिलांकडून म्हणजेच शेखलाल मास्तरांकडून आलेला धर्म जातीभेद विरहित ज्ञानदानाचा अन मानवतेचा वसा व वारसा गुरुजींनी आयुष्यभर जीवापाड जपला.

स्वातंत्र्यपूर्वकाळात जन्मलेल्या गुरुजींनी शंभर दीडशे रुपयावर सुरू केलेली आपली शिक्षकाची नोकरी सेवानिवृत्तीच्या वेळी अर्ध्या लाखाच्या आसपास गेली तरी आपला साधेपणा सोडला नाही. आयुष्यात अनेक कौटुंबिक आणि सार्वजनिक चढ-उतार आले तरी गुरुजींनी आपल्या कर्तव्यावरील आपली निष्ठा तसूभरही ढळू दिली नाही, आपले कर्तव्य त्यांनी अगदी प्रामाणिकपणे तत्वाला आणि शिक्षकी पेशाला धक्का न लागू देता शेवटपर्यंत हव्याहतपणे जपले.

गुरुजींनी केवळ शिक्षकी पेशाच नाही तर आपल्या वर्तनातून समाज शिक्षकाची महत्त्वाची जबाबदारी तत्त्वनिष्ठेने काटेकोरपणे पाळली.

सेवानिवृत्तीनंतर गुरुजींनी आपल्या शेतातील अगदी साध्या घरामध्ये आपला काळ व्यतीत केला.

काटक शरीरयष्टी,भली मोठी उंची, सावळा रंग, चेहऱ्यावर नेहमीच धीर गंभीर भाव, पांढरा शुभ्र कमीज व पायजमा, विरळ पण वाढलेली दाढी, डोक्यावर टोपी आणि हातात पिशवी घेऊन पायी चालत शिरसाळ्याला निघालेले गुरुजी ही त्यांची प्रतिमा माझ्या हृदयावर कायमची कोरल्या गेलेली आहे. साधेपणा हा गुरुजींच्या आयुष्याचे महत्त्वाचे अंग होते. वयाची नव्वदी पार करून शंभरीकडे वाटचाल करत असताना सुद्धा त्यांनी कधी आपल्या वाचनात व नमाज पठणात खंड पडू दिला नाही. वर्तमानपत्र वाचणे हा गुरुजींचा अत्यंत महत्त्वाचा छंद व व्यासंग होता.विशेष म्हणजे त्यांनी कुठलाच चष्मा न वापरता शेवटपर्यंत वाचन केले. मी गावाकडे गेलो की त्यांच्या शेताच्या बांधावरून जाताना बाजेवर बसून वर्तमानपत्र वाचत बसलेले गुरुजी बरोबर मला ओळखायचे आणि हाताने पालवून जवळ बसून हातात हात घेऊन अगदी आस्तेवाईपणे कौटुंबिक ख्याली खुशाली विचारायचे, त्यांच्या हाताच्या त्या मऊ स्पर्शामध्ये मला क्षणभर माझ्या वडिलांच्या मायेची उब मिळाल्यासारखं वाटायचं.

बोलता बोलता मी एकदा त्यांना म्हणालो "गुरुजी तुम्ही शंभरी गाठली की माझ्या वडिलाप्रमाणे तुमचाही शतक महोत्सव करूयात"

गुरुजींनी मिस्कील हसून टोलवाटोलवी केली. आणि काही दिवसांनीच गुरुजींनी या जगाचा निरोप घेतला. अन माझी ती मनोकामना अधुरीच राहिली. आता गुरुजी नाहीत पण जाता येता त्यांची आठवण मनाचा कोपरा हळवा करून जाते. अगदी शेवटच्या दिवसांमध्ये मी व गुरुजी गप्पा मारताना माझ्या मुलाने (सुमंतने)घेतलेले हे छायाचित्र म्हणजे गुरुजींच्या आठवणीची एक शिदोरीच आहे.

■ **अनंत मुंडे (लेखक कवी शाहीर)**

■ **कार्याध्यक्ष - मराठवाडा साहित्य परिषद परळी वैजनाथ- ९४२०३३१२१७**

परळी पर्यटन विकास - एक दूरदृष्टीचा संकल्प आराखडा

■ **संकल्पना : सेवकराम जाधव**
शब्दांकन : केशव डि. मुंडे (पत्रकार)

परळी वैजनाथ... नुसतं नाव घेतलं तरी भक्ताच्या मनात श्रद्धेचा झरा फुटतो. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेलं श्री वैद्यनाथाचं पावन धाम. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून, देशाच्या विविध राज्यांतून दरवर्षी लाखो भाविक इथे येतात. देवाचं दर्शन घेतात, नवस फेडतात आणि परत जातात.

पण एक प्रश्न आपण सर्वांनीच स्वतःला विचारायला हवा. भाविक येतो, दर्शन घेतो आणि निघून जातो. तो परळीत थांबतो का? तो परळी तालुक्यात फिरतो का? त्याच्यामुळे इथल्या स्थानिक तरुणाला रोजगार मिळतो का? इथल्या शेतकऱ्याच्या, छोट्या दुकानदाराच्या हाताला काम मिळतं का?

■ खरं उत्तर आहे - नाही.

परळीला फक्त दर्शनाचं ठिकाण न ठेवता, मुक्कामाचं ठिकाण बनवायचं असेल, तर आपल्याला धार्मिक, निसर्ग आणि जल पर्यटन यांचा एकत्रित विकास करावाच लागेल. हाच विचार घेऊन श्री सेवकराम जाधव यांनी परळी तालुक्यासाठी एक सर्वसमावेशक संकल्प आराखडा मांडला आहे. हा केवळ कागदावरचा आराखडा नाही, तर परळीचं भविष्य बदलणारी दूरदृष्टी आहे.

■ १) धार्मिक पर्यटन - श्रद्धेचा वारसा, संस्कृतीची ओळख

परळी तालुका हा केवळ वैद्यनाथापुरता मर्यादित नाही. या तालुक्याच्या मातीत अनेक संत, अनेक देवस्थानं, अनेक पुरातन परंपरा दडलेल्या आहेत. त्या एका माळेत ओवायची गरज आहे. संत केदारी महाराज तीर्थक्षेत्र, सारडगाव आणि हाकाऱ्या-पुकाऱ्या डोंगर, वैजवाडी हे या सर्किटचं महत्त्वाचं केंद्र ठरू शकतं. केदारी महाराजांची तपोभूमी, त्यांचा इतिहास आणि डोंगरातील निसर्ग यांचा संगम भाविकांना वेगळाच अनुभव देईल.

त्यासोबतच काळभैरवनाथ देवस्थान मांडवा, आंधारेश्वर महादेव मंदिर मालेवाडी, सोमेश्वर मंदिर जिरेवाडी, रतनेश्वर मंदिर टोकवाडी, विठ्ठल टेकडी मंदिर नंदागौळ, पद्मावती मंदिर पुस, ऐतिहासिक पुरातन केदारेश्वर मंदिर धर्मापुरी, भैरवनाथ मंदिर मांडावा, दुर्मिळ असे झुरुळे गोपीनाथ देवस्थान गणेशपार, मरळसिद्धेश्वर मंदिर नागझरी,रामनाथ महादेव मंदिर तपोवन ही सर्व देवस्थानं एका धार्मिक पर्यटन मार्गाने जोडली तर भाविकाला दोन-तीन दिवसांचा परिपूर्ण प्रवास करता येईल.

यात सर्वात अद्भुत आहे सरस्वती नदीचा उगम - गोमुख. उगमापासून अवघ्या १० फुटांवर अदृश्य होणारं पाणी हे एक निसर्गाचं आणि श्रद्धेचं गूढ आहे. देशात अशी ठिकाणं फार कमी आहेत. या ठिकाणाचा वैज्ञानिक आणि धार्मिक महत्त्वासह विकास झाला तर देशभरातील पर्यटक इथे येतील.

आणि गोपीनाथ गड - हा केवळ धार्मिक नाही तर ऐतिहासिक वारसा आहे. त्याचं जतन आणि संवर्धन केलं तर तरुण पिढीला आपल्या इतिहासाची ओळख होईल. म्हणूनच या सर्व ठिकाणी रस्ते, पिण्याचं पाणी, स्वच्छता, पार्किंग, माहिती फलक, भाविक निवास आणि स्थानिक गाईडची व्यवस्था करणं अत्यावश्यक आहे. एका ठिकाणी दर्शन घेऊन भाविक निघून जाणार नाही, तर तो पुढच्या ठिकाणी जाईल, अशी साखळी तयार करायला हवी.

■ २) निसर्ग पर्यटन - बालाघाट डोंगररांग : परळीचं खरं सोनं

परळीच्या एका बाजूला उभी असलेली बालाघाट डोंगररांग ही परळीची खरी संपत्ती आहे. आज ती दुर्लक्षित आहे, पण उद्या तीच परळीची ओळख होऊ शकते. डोंगरावरून दिसणारा सूर्योदय आणि सूर्यास्त हा अविस्मरणीय अनुभव असतो. यासाठी डोंगरावर सुरक्षित व्ह्यू पॉईंट तयार करता येतील. सकाळी सूर्योदय पाहायला आलेला पर्यटक संध्याकाळपर्यंत परळीतच थांबेल.



त्यासाठी सुरक्षित पायवाटा आणि ट्रेकिंग मार्ग तयार करणं गरजेचं आहे. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन तरुण, शहरातले नोकरदार यांना ट्रेकिंगचं मोठं आकर्षण असतं. प्रशिक्षित स्थानिक तरुण गाईड म्हणून काम करू शकतात. डोंगररांग ही पक्ष्यांचं माहेरघर आहे. पक्षी निरीक्षण केंद्र उभारलं तर पर्यावरणप्रेमी आणि छायाचित्रकार इथे गर्दी करतील. सोबतच डोंगर परिसरात स्थानिक खाद्यपदार्थांचे केंद्र सुरू केलं तर महिला बचत गटांना, स्थानिक शेतकऱ्यांना थेट रोजगार मिळेल. बाजरीची भाकरी, पिठलं, ठेचा, उसाचा रस - याची चव शहरात मिळत नाही. आणि धर्मापुरी किल्ला - हा किल्ला केवळ दगडधोंड्यांचा ढिगारा नाही, तर तो आपल्या पराक्रमाचा साक्षीदार आहे. त्याचं संवर्धन, त्याची माहिती देणारे फलक आणि तिथपर्यंत जाणारा सुरक्षित रस्ता यामुळे इतिहासप्रेमी पर्यटक वाढतील. बालाघाट डोंगररांग पर्यटन विकास प्रकल्प हा स्वतंत्र प्रकल्प म्हणून राबवला तर परळीला एक वेगळी ओळख मिळेल - "श्रद्धा आणि निसर्गाचं गाव."

■ ३) जल पर्यटन - तलावांचं शहर म्हणून परळी

परळी तालुक्यात पाण्याची कमतरता आहे असं आपण म्हणतो, पण आपल्याकडे चांदापूर तलाव, नागापूर तलाव आणि बोरणा तलाव (ननंज) असे तीन सुंदर तलाव आहेत. या तलावांना जर पर्यटनाचं रूप दिलं तर संध्याकाळी कुटुंबासोबत फिरायला जाण्याचं ठिकाण तयार होईल. या तलावांवर पायडल बोटिंग आणि मोटार बोटिंग सुरू करता येईल. लहान मुलांसाठी, तरुणांसाठी ही मोठी आकर्षणं ठरतील.

तलावाकाठी उद्यान व बैठक व्यवस्था, खाद्यपदार्थ केंद्र, सेल्फी पॉईंट आणि सायंकाळी प्रकाश योजना केल्यास हे तलाव केवळ पाणी साठवण्याची ठिकाणं न राहता, आनंदाची ठिकाणं होतील. संध्याकाळी प्रकाशात न्हाऊन निघालेला तलाव पाहायला लोक मुद्दाम येतील. जल पर्यटनामुळे स्थानिकांना बोट चालवणे, उद्यान सांभाळणे, खाद्य स्टॉल चालवणे यातून कायमस्वरूपी रोजगार मिळेल.

■ ४) परळी तालुक्यासाठी स्वतंत्र जलसंधारण आराखडा

पर्यटन वाढवायचं असेल तर आधी पाणी वाचवायला हवं. त्यामुळे परळी तालुक्यासाठी स्वतंत्र जलसंधारण आराखडा ही काळाची गरज आहे.

बालाघाट डोंगरातून वाहून येणारं पावसाचं पाणी अडवणं, जुन्या तलावांचं खोलीकरण, बंधारे, पाझर तलाव आणि सरस्वतीसारख्या नद्यांचं पुनरुज्जीवन यावर भर द्यायला हवा. पाणी असेल तर शेती फुलते, शेती फुलली तर पर्यटन फुलतं. जलसंधारण आणि पर्यटन हे एकमेकांना पूरक आहेत, विरोधी नाहीत.

जलनायक मयांक गांधी यांनी सुरू केलेली जलक्रांती परळी तालुक्यास नक्किच पाणीदार करणारी आहे. जलनायक मयांक गांधी यांचे परळी तालुक्यावर अनंत उपकार आहेत.

■ ५) परळीला शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित करणे

पर्यटनासोबतच परळीला शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित करणं हा या आराखड्याचा महत्त्वाचा भाग आहे. वैद्यनाथाच्या नगरीत चांगली महाविद्यालयं, स्पर्धा परीक्षांचं मार्गदर्शन, तांत्रिक शिक्षण, पर्यटन व्यवस्थापनाचा कोर्स, हॉटेल मॅनेजमेंट यासारखे अभ्यासक्रम सुरू झाले तर तालुक्यातील मुलांना शिक्षणासाठी बीड, लातूर, पुण्याला जावं लागणार नाही. शिक्षणासाठी आलेला विद्यार्थी हाच उद्याचा पर्यटक, उद्याचा उद्योजक असतो.

■ ६) स्थानिक युवकांसाठी उद्योग व रोजगारनिर्मिती

या संपूर्ण आराखड्याचा आत्मा म्हणजे स्थानिक युवकांना रोजगार. हॉटेल, लॉजिंग, टुरिस्ट गाईड, ट्रॅव्हल्स, खाद्यपदार्थ निर्मिती, हस्तकला, फोटो-व्हिडिओ, बोटिंग, ट्रेकिंग गाईड - या सगळ्यात हजारो रोजगार तयार होऊ शकतात. युवकांना शहरात स्थलांतर करण्याची गरज भासणार नाही. तो आपल्याच गावात, आपल्याच तालुक्यात स्वाभिमानाने उभा राहील. महिला बचत गटांसाठी खाद्य केंद्र, प्रसाद निर्मिती, स्थानिक उत्पादनांची विक्री यातून महिलांनाही आर्थिक बळ मिळेल.

■ ७) शहर आणि ग्रामीण भाग यांचा एकत्रित विकास.

परळीचा विकास म्हणजे केवळ परळी शहराचा विकास नव्हे. गाव खेड्यांचा विकास झाल्याशिवाय परळीचा विकास पूर्ण होणार नाही. शहरातील सुविधा आणि ग्रामीण भागातील निसर्ग, श्रद्धा आणि संस्कृती यांचा मेळ घातला तरच खरा एकत्रित विकास होईल. भाविक शहरात मुक्काम करेल, दिवसा गावात फिरेल, गावातलं खाईल, गावातलं विकत घेईल - हेच खरं अर्थचक्र आहे.

■ समारोप - आता चर्चेतून कृतीकडे

परळी वैजनाथच्या पर्यटन विकासासाठी बालाघाट डोंगररांग, वैद्यनाथ मंदिर, भाविकांचा मुक्काम वाढवणे आणि पर्यटन सुविधा याविषयी आता एकत्रित चर्चा होणं आवश्यक आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन, सामाजिक संस्था, पत्रकार, व्यापारी, शेतकरी आणि युवक - सर्वांनी एका व्यासपीठावर येऊन या आराखड्यावर चर्चा करावी, त्यात सुधारणा सुचवाव्यात आणि टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करावी. कारण परळीमध्ये सर्वकाही आहे - श्रद्धा आहे, निसर्ग आहे, पाणी आहे, इतिहास आहे, माणसं आहेत. फक्त त्याला एक दिशा देण्याची गरज आहे. हा संकल्प आराखडा तीच दिशा देणारा आहे. जर आपण आज पाऊल उचललं, तर उद्याची परळी ही केवळ दर्शनाची नगरी नसेल, तर मुक्कामाची, शिक्षणाची, रोजगाराची आणि आनंदाची नगरी असेल. आणि हेच खरं परळीचं वैभव असेल. परंतु त्यासाठी दृढ इच्छाशक्ती आणि दुरदृष्टीची गरज आहे

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)







संत मन्मथ स्वामींचे विचार जीवनाला दिशा देणारे : श्री गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज

'गुरुराज माऊली'च्या जयघोषात परळी ते कपिलधार पायी दिंडीचे प्रस्थान; शेकडो भाविकांचा सहभाग

परळी (प्रतिनिधी)

'गुरुराज माऊली'च्या जयघोषात, ढोल-ताशांचा गजर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी परळी ते कपिलधार संत श्री मन्मथ स्वामी पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहात प्रस्थान झाले. श्री गुरु सिद्धलिंग शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत या सहा दिवसीय पदयात्रेला सुरुवात झाली.

यावेळी श्री गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी संत मन्मथ स्वामींचे विचार आजही समाजाला दिशा देणारे असल्याचे सांगितले. संतांचे केवळ नामस्मरण न करता त्यांच्या शिकवणीचे आचरण जीवनात करावे. श्रद्धा, सदाचार, मानवता आणि सामाजिक एकोपा जपावा, असे आवाहन त्यांनी केले.

दिंडीपूर्वी महाराजांनी पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ प्रभूंचे दर्शन व आरती केली. त्यानंतर बेलवाडी येथील संत श्री गुरुलिंग स्वामी मठ संस्थानातून दिंडीने विद्यानगर येथील श्री शंभुमहादेव मंदिराकडे प्रस्थान केले. मार्गावर परळीकरांनी फुलांची उधळण करून भाविकांचे स्वागत केले. यावेळी विजयकुमार मेनकुदळे आणि योगेश भैय्या मेनकुदळे यांच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले.

दि. १८ ते २४ नोव्हेंबरदरम्यान ही दिंडी सेलू, तपोवन, दिंद्रुड, वडवणी, ढेकणमोहा, शिवणी तळे आणि पाळी मार्गे कपिलधार येथे पोहोचणार आहे. मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात शेकडो भाविक सहभागी झाले आहेत.

राष्ट्रीय एकात्मता : राष्ट्राच्या सामर्थ्याचा आणि प्रगतीचा आधार

भारत हा विविधतेने नटलेला आणि सांस्कृतिक समृद्धीचा वारसा लाभलेला देश आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या एका भागातील भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती आणि परंपरा दुसऱ्या भागापेक्षा वेगळ्या असल्या, तरी या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे भारतीयत्वाची भावना होय. ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात देशाविषयी आपलेपणा, परस्परांविषयी आदर, सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक जबाबदारी निर्माण करते. विविधतेचा स्वीकार करून एकतेची भावना जपणे, प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेचा सन्मान करणे आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ राजकीय किंवा भौगोलिक संकल्पना नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक आणि वैचारिक पातळीवर विकसित होणारी व्यापक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी १९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना विविधतेतील एकतेची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे देशातील सर्व नागरिकांनी आपापली स्वतंत्र ओळख विसरून एकसारखे जीवन जगणे नव्हे. प्रत्येकाला आपली भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा जपण्याचे स्वातंत्र्य असतानाच इतरांच्या वेगळेपणाचा आदर करण्याची मानसिकता विकसित होणे म्हणजे खरी राष्ट्रीय एकात्मता होय. विविधतेचे अस्तित्व मान्य करून त्यातून परस्पर विश्वास, सहकार्य, बंधुभाव आणि समान राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे हे तिचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या कोणत्याही भागातील नागरिकाला इतर प्रदेशातील नागरिक परका वाटू नये, तर सर्वजण एका व्यापक राष्ट्रीय कुटुंबाचे घटक आहेत, अशी भावना निर्माण झाली पाहिजे. ही भावना केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी व्यक्त होऊन चालणार नाही, तर दैनंदिन सामाजिक व्यवहारातही तिचे प्रतिबिंब दिसले पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासामध्ये राष्ट्रीय एकात्मतेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशातील विविध जाती, धर्म, भाषा आणि प्रदेशांतील नागरिक एकत्र आले होते. त्यांची सामाजिक पार्श्वभूमी आणि जीवनपद्धती वेगवेगळी असली, तरी परकीय सत्तेपासून मुक्त होऊन स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचे ध्येय समान होते. स्वातंत्र्यलढ्याने भारतीय समाजाला त्याग, सहकार्य, सामूहिक संघर्ष आणि देशप्रेमाची शिकवण दिली. या संघर्षामध्ये विविध समाजघटकांनी दिलेले योगदान भारतीय राष्ट्रीयत्वाच्या जडणघडणीसाठी महत्त्वपूर्ण ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशासमोर राष्ट्रीय अखंडता टिकविणे, लोकशाही व्यवस्था मजबूत करणे, सामाजिक विषमता दूर करणे आणि सर्वसमावेशक विकास साधणे ही आव्हाने होती. या सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची भावना अत्यावश्यक ठरली.

भारतीय संविधान हा राष्ट्रीय एकात्मतेचा सर्वांत महत्त्वाचा आधार आहे. संविधानाच्या उद्देशिकेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना विशेष स्थान देण्यात आले आहे. ही मूल्ये भारतीय लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांबरोबरच राष्ट्रीय एकात्मतेची दिशादर्शक तत्त्वे आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायामुळे प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळते. विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपासना यांचे स्वातंत्र्य व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे रक्षण करते. कायद्यापुढील समानता नागरिकांमधील भेदभावाला प्रतिबंध करते, तर बंधुतेची भावना व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व अखंडता टिकविण्यास मदत करते. त्यामुळे संविधानाचे पालन करणे, संविधानिक संस्थांचा आदर करणे आणि लोकशाही मूल्यांचे आचरण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. संविधानातील मूल्ये केवळ शासकीय व्यवस्था किंवा न्यायालयीन प्रक्रियेपुरती मर्यादित न राहता ती समाजाच्या सामूहिक जीवनात रुजली पाहिजेत.

राष्ट्रीय एकात्मतेच्या जडणघडणीत सामाजिक समतेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय समाजामध्ये जातीय भेदभाव, अस्पृश्यता, सामाजिक उच्चनीचता आणि आर्थिक विषमता यांसारख्या समस्या ऐतिहासिकदृष्ट्या अस्तित्वात राहिल्या आहेत. या विषमतेमुळे समाजातील अनेक घटकांना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या संधींपासून वंचित राहावे लागले. अशा परिस्थितीत केवळ एकतेच्या घोषणा देऊन सामाजिक एकात्मता साध्य होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान, समान संधी आणि न्याय्य वागणूक मिळणे आवश्यक आहे. जात, धर्म, लिंग, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक परिस्थिती यांच्या आधारावर कोणताही भेदभाव होता कामा नये. सामाजिक न्यायाची प्रभावी अंमलबजावणी, वंचित घटकांचे सक्षमीकरण आणि दुर्बल समूहांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेणे यांमधून राष्ट्रीय एकात्मतेचा पाया मजबूत होतो. समाजातील प्रत्येक घटकाला प्रतिष्ठेने जगण्याची संधी मिळणे ही सशक्त राष्ट्रनिर्मितीची पूर्वअट आहे.

धार्मिक विविधता ही भारतीय समाजाची महत्त्वपूर्ण ओळख आहे. भारतामध्ये विविध धर्मांचे, पंथांचे आणि श्रद्धापरंपरांचे नागरिक एकत्रितपणे राहतात. प्रत्येक धर्माची स्वतंत्र उपासना पद्धती, तत्त्वज्ञान, सांस्कृतिक परंपरा आणि जीवनविषयक दृष्टिकोन आहे. या विविधतेमुळे भारतीय संस्कृती अधिक समृद्ध झाली आहे. मात्र, धर्माच्या नावावर द्वेष, असहिष्णुता, पूर्वग्रह आणि संघर्ष निर्माण होणे हे राष्ट्रीय एकात्मतेसमोरील गंभीर आव्हान आहे. कोणत्याही धर्माचा अवमान न करता प्रत्येकाच्या श्रद्धेचा आदर करणे ही सुसंस्कृत समाजाची मूलभूत अपेक्षा आहे. धार्मिक श्रद्धा ही व्यक्तीच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग असली, तरी सार्वजनिक जीवनामध्ये मानवी मूल्ये, परस्पर सन्मान आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य मिळाले पाहिजे. विविध धर्मांच्या नागरिकांमध्ये संवाद वाढविणे, सामूहिक सामाजिक उपक्रम राबविणे आणि एकमेकांच्या सण-उत्सवांमध्ये सहभागी होणे यांमुळे परस्पर विश्वास दृढ होतो. धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव यांमुळे राष्ट्रीय एकात्मतेला स्थैर्य प्राप्त होते.

भाषिक विविधता ही भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग आहे. देशातील विविध राज्यांमध्ये अनेक भाषा आणि बोली बोलल्या जातात. प्रत्येक भाषेमध्ये त्या प्रदेशाचा इतिहास, लोकजीवन, साहित्य, ज्ञानपरंपरा आणि सांस्कृतिक अनुभव सामावलेले आहेत. मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, गुजराती, पंजाबी, आसामी आणि इतर अनेक भाषांनी भारतीय साहित्य व संस्कृती समृद्ध केली आहे. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसून प्रत्येक भाषेला तिचे स्वतंत्र महत्त्व आहे. मातृभाषेचा अभिमान बाळगणे स्वाभाविक असले, तरी इतर भाषांचा अवमान करणे योग्य नाही. भाषेच्या आधारावर प्रादेशिक श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होऊ नये. विविध भारतीय भाषांमधील साहित्याचे अनुवाद, भाषिक शिक्षण, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि आंतरराज्यीय संवाद यांमुळे परस्पर समज वाढते. भाषा ही माणसांना जोडणारी शक्ती ठरली पाहिजे, विभागणी करणारे साधन नव्हे.

राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी प्रादेशिक समतोल आणि सर्वसमावेशक विकासालाही विशेष महत्त्व आहे. भारतातील विविध राज्ये आणि प्रदेश नैसर्गिक साधनसंपत्ती, भौगोलिक परिस्थिती, औद्योगिक विकास, शेती, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी या बाबतीत वेगवेगळ्या स्थितीत आहेत. काही प्रदेशांमध्ये वेगाने विकास होत असताना काही भागांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम, डोंगराळ आणि सीमावर्ती भागांतील नागरिकांना शिक्षण, आरोग्य, वाहतूक, पिण्याचे पाणी आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होत नाहीत. विकासातील ही विषमता दूर करण्यासाठी सर्व प्रदेशांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे. स्थानिक गरजांनुसार विकासाचे नियोजन, पायाभूत सुविधांची उभारणी, रोजगारनिर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्यसेवांचा विस्तार यांमधून प्रादेशिक असमतोल कमी करता येतो. एखाद्या प्रदेशाचा विकास म्हणजे संपूर्ण देशाचा विकास, ही जाणीव प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे.

शिक्षण हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्यांची रुजवण होते. शाळा आणि महाविद्यालये ही केवळ ज्ञानप्राप्तीची केंद्रे नसून सामाजिक समरसता आणि जबाबदार नागरिकत्व घडविण्याची महत्त्वपूर्ण ठिकाणे आहेत. विविध जाती, धर्म, भाषा आणि आर्थिक स्तरांतील विद्यार्थी एकत्र शिकतात, खेळतात आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. या प्रक्रियेत त्यांच्यामध्ये परस्पर सहकार्य, मैत्री आणि समानतेची भावना विकसित होते. अभ्यासक्रमामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढा, संविधानिक मूल्ये, सामाजिक सुधारणा, विविध भारतीय संस्कृती, लोकशाही आणि मानवी हक्क यांचा समावेश असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षाभिमुख ज्ञान न देता जबाबदार नागरिकत्वाची जाणीव करून दिली पाहिजे. राष्ट्रीय सण, संविधान दिन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि आंतरराज्यीय विद्यार्थी देवाणघेवाण यांच्या माध्यमातून एकात्मतेची भावना अधिक दृढ करता येते.

आजच्या काळात युवकांची भूमिका राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. भारत हा तरुण लोकसंख्येचा देश असल्यामुळे देशाच्या वर्तमान आणि भविष्याची दिशा ठरविण्यात युवकांचा मोठा वाटा आहे. युवकांमध्ये ऊर्जा, कल्पकता, तंत्रज्ञानाची जाण आणि परिवर्तनाची क्षमता आहे. या क्षमतेचा उपयोग समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी, सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी आणि विकासात्मक उपक्रमांना गती देण्यासाठी झाला पाहिजे.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

युवकांनी जातीय आणि धार्मिक पूर्वग्रहांपासून दूर राहून विवेकपूर्ण विचार स्वीकारणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील अपप्रचार, द्वेषपूर्ण संदेश आणि अफवांना बळी न पडता माहितीची सत्यता तपासण्याची सवय त्यांनी विकसित केली पाहिजे. रक्तदान, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, ग्रामविकास आणि सामाजिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये युवकांचा सहभाग वाढल्यास समाजातील एकोपा अधिक दृढ होऊ शकतो. युवकांनी आपल्या वैयक्तिक प्रगतीबरोबरच समाजाच्या सामूहिक प्रगतीचाही विचार केला पाहिजे.

महिलांचा सहभाग आणि सक्षमीकरण हेदेखील राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्वाचे परिमाण आहे. भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय विकासात महिलांचे योगदान मोठे आहे. तथापि, आजही अनेक महिलांना लिंगभेद, हिंसाचार, असुरक्षितता, आर्थिक परावलंबित्व आणि सामाजिक बंधनांचा सामना करावा लागतो. महिलांना समान शिक्षण, रोजगार, निर्णयप्रक्रियेतील सहभाग आणि सुरक्षित सामाजिक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि आदिवासी महिलांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे, महिला बचत गटांना प्रोत्साहन देणे, नेतृत्वक्षमता विकसित करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील त्यांचा सहभाग वाढविणे या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. समाजातील निम्म्या लोकसंख्येला समान प्रतिष्ठा आणि संधी नाकारून राष्ट्रीय एकात्मतेची कल्पना पूर्ण होऊ शकत नाही. महिला सक्षमीकरणामुळे कुटुंब, समाज आणि राष्ट्र या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.

ग्रामीण आणि आदिवासी समाजाचा राष्ट्रीय एकात्मतेतील सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. भारताच्या ग्रामीण जीवनामध्ये शेती, पशुपालन, ग्रामोद्योग, लोककला आणि पारंपरिक ज्ञानव्यवस्थांचा मोठा वाटा आहे. आदिवासी समाजाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषा, नृत्य, संगीत, लोकपरंपरा, निसर्गाशी असलेले नाते आणि सामुदायिक जीवनपद्धती यांद्वारे भारतीय संस्कृतीला समृद्ध केले आहे. मात्र, विकासाच्या प्रक्रियेत या समाजांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यांच्या जमिनी, जंगल, जलस्रोत, पारंपरिक उपजीविका आणि सांस्कृतिक अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला केवळ विकास योजनांचा लाभार्थी न मानता विकास प्रक्रियेतील सक्रिय भागीदार म्हणून स्थान दिले पाहिजे. त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा सन्मान, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग आणि शिक्षण व रोजगाराच्या संधींचा विस्तार यांमधून राष्ट्रीय एकात्मता अधिक व्यापक आणि समावेशक बनू शकते.

राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आधुनिक आव्हानांमध्ये जातीयवाद, धार्मिक कट्टरता, भाषिक संघर्ष, प्रादेशिक अस्मिता, आर्थिक विषमता आणि राजकीय ध्रुवीकरण यांचा समावेश होतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा आणि राजकीय विचारधारा स्वीकारण्याचा अधिकार आहे. मात्र, मतभिन्नतेचे रूपांतर वैयक्तिक द्वेषात किंवा सामाजिक संघर्षात होता कामा नये. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक जीवनातील नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींनी समाजामध्ये बंधुभाव आणि संवादाचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. निवडणुकीच्या राजकारणात जात, धर्म आणि भाषेच्या आधारावर समाजाचे विभाजन करण्याचे प्रयत्न लोकशाहीच्या मूलभूत भावनेला बाधा पोहोचवतात. राजकीय मतभेद असले तरी राष्ट्रीय हित, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. मतभिन्नता ही लोकशाहीची ताकद आहे; परंतु परस्परांचा द्वेष करणे ही तिची कमजोरी आहे, याचे भान समाजाने ठेवले पाहिजे.

समाजमाध्यमे आणि माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेला नवीन परिमाण प्राप्त झाले आहे. आज माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होतो. देशातील एका भागात घडलेली घटना काही क्षणांत संपूर्ण देशापर्यंत पोहोचते. यामुळे विविध प्रदेशांतील लोकांना एकमेकांच्या समस्या, संस्कृती आणि सामाजिक परिस्थिती समजून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मात्र, याच माध्यमांचा गैरवापर करून खोट्या बातम्या, अफवा, धार्मिक तेढ निर्माण करणारे संदेश आणि द्वेषपूर्ण मजकूर पसरविला जातो. अशा माहितीमुळे समाजात गैरसमज, अविश्वास आणि संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि माध्यम साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. कोणतीही माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, विश्वासार्ह स्रोतांचा आधार घेणे आणि जबाबदारीने अभिव्यक्ती करणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांचा उपयोग विविध संस्कृतींची ओळख करून देण्यासाठी, राष्ट्रीय प्रश्नांवर विधायक चर्चा घडविण्यासाठी आणि सामाजिक सहकार्य वाढविण्यासाठी केला पाहिजे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी आर्थिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासदेखील तितकाच आवश्यक आहे. बेरोजगारी, गरिबी, महागाई, कुपोषण आणि शिक्षणातील असमानता या समस्या समाजामध्ये असंतोष निर्माण करू शकतात. आर्थिक संधींचे केंद्रीकरण झाल्यास समाजातील विविध घटकांमध्ये दरी वाढते. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागांतील आर्थिक अंतर कमी करणे, लघुउद्योगांना प्रोत्साहन देणे, कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि तरुणांसाठी रोजगारनिर्मिती करणे गरजेचे आहे. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, असंघटित क्षेत्रातील कामगारांची सुरक्षितता, स्थलांतरित मजुरांचे प्रश्न आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे सक्षमीकरण यांना राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी स्थान मिळाले पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाला राष्ट्राच्या प्रगतीमध्ये योगदान देण्याची संधी मिळाल्यास नागरिकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते. विकासाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचविणे हेच राष्ट्रीय एकात्मतेचे व्यावहारिक स्वरूप आहे.

राष्ट्रीय एकात्मतेमध्ये कला, साहित्य, संगीत, क्रीडा आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. भारतातील लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत, नाट्यपरंपरा आणि साहित्य यांमधून विविध समाजघटकांच्या जीवनाचे दर्शन घडते. महाराष्ट्रातील लावणी, पोवाडा, भारूड आणि आदिवासी नृत्यपरंपरा जशा सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहेत, तसेच देशातील इतर प्रदेशांतील कला आणि परंपराही राष्ट्रीय संस्कृतीला समृद्ध करतात. साहित्यिक आणि सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धा, युवक महोत्सव आणि आंतरराज्यीय सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून विविधतेतील एकतेचा अनुभव घेता येतो. क्रीडा क्षेत्रामध्ये भाषिक, धार्मिक आणि प्रादेशिक भेद बाजूला ठेवून खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतात. भारतीय संघाच्या विजयात प्रत्येक नागरिकाला आनंद होतो, कारण त्या क्षणी वैयक्तिक आणि प्रादेशिक ओळखींपेक्षा राष्ट्रीय ओळख अधिक महत्त्वाची ठरते. अशा अनुभवांमुळे सामूहिक अभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होते.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्येही राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये खोलवर रुजलेली आहेत. संतपरंपरेने समता, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यातून समता, शिक्षण, न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित झाले. महाराष्ट्रातील विविध जाती, धर्म, भाषा आणि सांस्कृतिक समूहांनी एकत्रितपणे सामाजिक जीवन समृद्ध केले आहे. राज्याच्या ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत विविध प्रदेशांतील लोक रोजगार, शिक्षण आणि व्यवसायाच्या निमित्ताने एकत्र राहतात. या सहअस्तित्वाला परस्पर आदर, सामाजिक सहकार्य आणि समान संधींची जोड मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची परंपरा राष्ट्रीय एकात्मतेच्या व्यापक ध्येयाला प्रेरणा देणारी आहे.

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र

• बीड, गुरुवार, 19 नोव्हेंबर 2026





जन्मभूमी रामेश्वर नगरीत ऋषिकेशदादा कराड यांच्या विजयाचा जल्लोष!

ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी अन् गुलालाची उधळण भूमिपुत्राच्या स्वागतासाठी संपूर्ण गाव रस्त्यावर



लातूर | लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी विजय मिळविल्यानंतर त्यांच्या जन्मभूमी असलेल्या रामेश्वर नगरीत आनंदोत्सवाला उधाण आले. आपल्या भूमिपुत्राने मिळविलेल्या यशाचा अभिमान व्यक्त करीत ग्रामस्थांनी ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची मुक्त उधळण करून त्यांचे भव्य स्वागत केले. संपूर्ण गावात विजयाचा उत्साह पाहायला मिळाला.

ऋषिकेशदादा कराड यांनी या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार अशोक गोविंदपुरकर यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केल्याची माहिती समोर येताच रामेश्वर नगरीत जल्लोष सुरू झाला. ग्रामस्थ, युवक, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येत आपल्या लाडक्या भूमिपुत्राच्या स्वागतासाठी सज्ज झाले. गावातील रस्ते आणि चौक विजयाच्या घोषणांनी दुमदुमून गेले.

गावातून भव्य विजयी पदयात्रा; विविध धार्मिक स्थळांचे घेतले दर्शन

रामेश्वर नगरीत आगमन होताच ऋषिकेशदादा कराड यांची भव्य विजयी पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेदरम्यान त्यांनी गावातील प्रभू श्रीराम मंदिर, हजरत जैनुद्दीन चिस्ती दर्गा, तथागत गौतम बुद्ध विहार, संत श्री गोपाळ बुवा महाराज मंदिर तसेच आईच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले आणि आशीर्वाद घेतले. विविध धार्मिक स्थळांना भेट देत त्यांनी गावातील सर्वधर्मीय श्रद्धास्थानांप्रती आदर व्यक्त केला.

पदयात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले. महिलांनी औक्षण केले, तर ज्येष्ठ नागरिकांनी पुष्पहार घालून आणि पेढे भरवून ऋषिकेशदादांचे अभिनंदन केले. युवकांनी ढोल-ताशांच्या तालावर आणि विजयाच्या घोषणांनी उत्सवात रंग भरला.

जन्मभूमीतील प्रेमाने विजयाचा आनंद द्विगुणित

गावातील लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच स्तरांतील नागरिकांनी या आनंदोत्सवात सहभाग घेतला. आपल्या गावातील तरुण नेतृत्वाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मिळविलेल्या यशाबद्दल ग्रामस्थांनी समाधान आणि अभिमान व्यक्त केला. जन्मभूमीतील नागरिकांनी दाखविलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि प्रेम पाहून ऋषिकेशदादांच्या विजयाचा आनंद अधिकच द्विगुणित झाला.

विजयी पदयात्रेचा समारोप त्यांच्या निवासस्थानी करण्यात आला. यावेळी कुटुंबातील ज्येष्ठ मार्गदर्शक तुळशीरामअण्णा कराड, काशीरामनाना कराड, बालासाहेबतात्या कराड यांच्यासह घरातील सर्व ज्येष्ठांचे ऋषिकेशदादा यांनी आशीर्वाद घेतले. उपस्थितांनी त्यांचे पुष्पहार घालून अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या विजयी सोहळ्यास नारायणआण्णा कराड, सुधाकर कराड, बबलू कमाल पटेल, नाथराव कराड, विष्णू कराड, मनोज गिरी, फारुख पठाण, चंदुलाल पठाण, बालासाहेब कराड, बिभीषण कराड, पांडुरंग चव्हाण, आत्माराम कराड, किशनराव कराड, शालिक कराड, दिलीप गायकवाड, राजाभाऊ जाधवर, जानू पटेल, अश्रुबा जाधवर, नागनाथ गिरी, जगन चव्हाण, शंकर चव्हाण, मंगेश शिंदे, कुलदीप कराड, परमेश्वर कराड, सुनील कराड, विष्णू भोसले यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील विजयाच्या निमित्ताने रामेश्वर नगरीत रंगलेला हा आनंदोत्सव केवळ राजकीय विजयाचा जल्लोष न ठरता जन्मभूमी आणि भूमिपुत्र यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्याचे दर्शन घडवणारा ठरला.

पवनचक्की कंपन्यांना पाठबळाचा आरोप; प्रशासनाच्या निषेधार्थ रास्ता रोको



बीड | बीड तालुक्यातील बाला घाटावरील चौसाळा परिसरात पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर होत असलेली दडपशाही, आर्थिक लूट, मानसिक छळ आणि विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना खंडणीचे गुन्हे दाखल करण्याच्या दिल्या जाणाऱ्या धमक्यांविरोधात शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बुधवार १८ नोव्हेंबर रोजी चौसाळा बसस्थानकासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

चौसाळा, कानडीघाट, गोलंग्री, माळेवाडी, बोरखेड, घारगाव, रुईगव्हाण, वडवाडी आणि बाभळगाव परिसरात कार्यरत पवनचक्की कंपन्यांच्या कारभाराविरोधात शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. पवनचक्की कंपन्यांची दादागिरी थांबवा, शेतकऱ्यांची लूट बंद करा, कंपन्यांची पाठराखण करणाऱ्या महसूल व पोलिस प्रशासनाचा धिक्कार असो, अशा घोषणा शेतकऱ्यांनी दिल्या. आंदोलनानंतर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन देण्यात आले. तहसीलदार चंद्रकांत शेळके , नेकनूर पोलिस ठाण्याचे सपोनी मंगेश साळवे यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी नेकनूर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक व पोलिस कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने २१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवनऊर्जा प्रकल्पांसाठी जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व उपविभागीय स्तरावर संनियंत्रण समित्या स्थापन करण्याबाबत शासन आदेश काढला आहे. प्रत्यक्षात या संनियंत्रण समित्या अस्तित्वात असूनही त्यांचे कामकाज प्रभावीपणे होत नसल्याचे चित्र आहे. प्रशासनाकडे तक्रारी करूनही न्याय मिळत नसल्याने कंपन्यांचे मनोबल वाढत असल्याचा आरोप डॉ. गणेश ढवळे यांनी केला.

शेतकऱ्यांची परवानगी न घेता शेतजमिनीत विद्युत खांब उभारणे, शेतातून विद्युत वाहिन्या व पोल उभारण्याचे काम करणे, योग्य मोबदला न देता अथवा वटणार नसलेले धनादेश देऊन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करणे, कामाला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना दमदाटी करून खंडणीचे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देणे, महसूल व पोलिस यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीररीत्या जमिनीचे अधिग्रहण सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केले आहेत.

पिण्याच्या पाण्यासाठी कुकडीतून सीना, मेहेकरी धरणात पाणी सोडा!

माजी आमदार बाळासाहेब आजबे यांची उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे मागणी; उपमुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद, अधिकाऱ्यांना सूचना

आष्टी (प्रतिनिधी)



आष्टी विधानसभा मतदारसंघात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांतील अनेक गावांना सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. आगामी काळात पाणीटंचाई आणखी तीव्र होण्याची शक्यता असल्याने कुकडी प्रकल्पातून सीना धरणात आणि तेथून मेहेकरी धरणात पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे मुंबई येथे लेखी पत्राद्वारे केली. त्यांच्या या मागणीला उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना पाणी सोडण्याबाबत आवश्यक सूचना केल्या आहेत.

कुकडी प्रकल्पातून सध्या कर्जत तालुक्यातील रब्बी पिकांसाठी पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले आहे. मात्र, आष्टी तालुक्यातील पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती लक्षात घेता हे आवर्तन रद्द करून संबंधित पाणी सीना धरणात सोडण्यात यावे आणि सीना धरणातून मेहेकरी प्रकल्पात पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी भूमिका आजबे यांनी पत्रातून मांडली आहे. सध्या तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाण्याचे टँकर सुरू असून, येत्या काही दिवसांत टँकर भरण्यासाठीही पाणी उपलब्ध होणे कठीण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यातील पाणी संकट टाळण्यासाठी आतापासूनच पाण्याचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

आष्टी तालुक्यातील बहुतांश लघू व मध्यम जलप्रकल्प सध्या कोरडेठाक पडले आहेत. त्यामुळे तालुक्यातील अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सीना आणि मेहेकरी धरणातील पाण्यावर अवलंबून आहे. दुष्काळामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत सीना व मेहेकरी धरणात पाणी उपलब्ध झाल्यास आष्टी तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यावरील अवलंबित्व कमी होऊन पुढील काही दिवसांसाठी पाणीटंचाईवर मात करणे शक्य होणार आहे.

दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना आष्टी तालुक्याच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची गरज आहे. कर्जत तालुक्यासाठी सोडण्यात येणाऱ्या रब्बी आवर्तनाचा फेरविचार करून कुकडीचे पाणी सीना व मेहेकरी धरणात सोडण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी केली आहे. त्यांच्या मागणीवर उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्याने आष्टी तालुक्याच्या पाणीप्रश्नाबाबत आशा निर्माण झाली आहे.